जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४७०      दिनांक - २७/०६/२०२३**

# मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर

## २६ जुन आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिना निमित्त मॅरेथॉनचे आयोजन करुन केली व्यसनमुक्ती बाबत जनजागृती

मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.रितेश कुमार, यांचे सुचने वरुन मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर मा.विक्रांत देशमुख, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-५ पुणे शहर श्री. रंजनकुमार शर्मा, मा.सहा.पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे शहर श्रीमती अश्विनी राख यांच्या मार्गदर्शनाखाली, मुंढवा पोलीस ठाणे कडून ०५ कि.मी. मॅरेथॉनचे दिनांक २६/०६/२०२३ रोजी सकाळी ०६.०० वा. दरम्यान आयोजन करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवसाचे निमित्त पोलीस ठाणे हद्दीत विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अंमली पदार्थ विरोधी जनजागृती करणेसाठी मुंढवा पोलीस ठाणे कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) प्रदीप काकडे, सहा. पोलीस निरीक्षक, समीर करपे, विलास सुतार, साहेबा पोटे, पोलीस उप-निरीक्षक, प्रमोद कोळेकर, अनिल बिनवडे, शिवाजी काटे, अश्विनी भोसले, धनंजय गाडे व अंमलदार तसेच पुणे शहरात नागरिकांना फिटनेसचे धडे देणारे ब्ल्यू ब्रिगेडचे संस्थापक श्री. अजय देसाई व त्याचे टिम, सुप्रभात ग्रुप मुंढवाचे सदस्य श्री. विक्रम लोणकर, श्री. सोमनाथ गायकवाड, श्री. पांडूरंग लांजुरकर, श्री. दिलीप झगडे, श्री. देविदास वंजारी, श्री. राहूल दारवडकर, श्री. संजय कदम, श्री. प्रशांत जोशी, श्री. नंदू कोद्रे व त्यांचे सहकारी, आयर्नमॅन शंतनू जगदाळे, मुंढवा येथील स्थानिक नागरिक यांनी ०५ कि.मी. मॅरेथॉन अभियानमध्ये सहभाग घेवून बॅनर, घोषण देवून अंमली पदार्थ विरोधी जनजागृती केली.

सदर मॅरेथॉन पार पाडण्यासाठी डॉ.अशिष तापडीया यांनी त्याचे हॉस्पीटल गंगा नर्सिंग होम, मुंढवा कडून रुग्णवाहीका, व श्री. संतोष यादव यांनी ॲडव्हटायझिंग व्हॉन उपलब्ध करुन दिली होती. आनंदी जीवन जगतांना शारिरीक व मानसिक स्वास्थ उत्तम पध्यतीचे राहण्यासाठी व्यसनाचे आहारी न जाता नियमित व्यायाम करावा याबाबत उपस्थितीत मान्यवरांनी मार्गदर्शन केले. या अभियानाअंतर्गत मॅरेथॉन मध्ये सहभागी अधिकारी, अंमलदार, नागरिक यांचेसाठी झुंबा प्रशिक्षक, पुनम जैन यांचे झुंबा डान्सचे आयोजन करण्यात आले. सदर मॅरेथॉन स्पर्धा व अभियान मा. सहा. पोलीस आयुक्त श्रीमती अश्विनी राख, यांचे उपस्थितीत पार पडले आहे.